जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 JAN 2026

पुण्यनगरी

# मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात



कोल्हापूर : मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळेतील सहभागी व मार्गदर्शक.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात झाली.

यामध्ये पहिल्या दिवशी विश्वासराव नाईक महाविद्यालय, शिराळाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. तानाजी हवालदार, दुसऱ्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील मोडीतज्ज्ञ मच्छिंद्र चौधरी, तिसऱ्या दिवशी मोडीतज्ज्ञ पांडुरंग आंबले, चौथ्या दिवशी महावीर महाविद्यालय येथील इतिहास विभागाचे सहायक प्राध्यापक चंद्रशेखर काटे आणि पाचव्या दिवशी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय येथील सहायक प्राध्यापिका डॉ. पूनम भुयेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचा सांगता समारंभ छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. पूनम भुयेकर यांच्या विशेष उपस्थितीत झाला. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. एकूण ४० विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला.

जनसंपर्क कक्ष

11 JAN 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिस्त, सातत्य, परिश्रमाच्या जोरावर यश प्राप्त करता येते

## -कुलसचिव शिंदे

नणुंद्रे : आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा मर्यादित व योग्य वापर करून अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे अत्यंत गरजेचे आहे. शिस्त, सातत्य व परिश्रम याच्या जोरावरच यश प्राप्त करता येते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

ते श्रीपतराव चौगुले आर्टस् अँड सायन्स कॉलेज, माळवाडी कोतोली येथे आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरक संदेश देत शिक्षणासोबतच मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोल्हापूर जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व आरोग्य समिती सभापती तथा ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचा संकल्प अधोरेखित केला. कार्यक्रमास ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष प्रा. जी. टी. पाटील, खजिनदार मारुती चौगुले, सचिव शिवाजी पाटील, संचालक कल्पनाताई चौगुले, प्रकाश पाटील, प्रा. वेदिका चौगुले, डॉ. अजय चौगुले, विजय चौगुले, डॉ. भालचंद्र कोरे, डॉ. मीना पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय श्रीपतराव चौगुले दादा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच महाविद्यालयाच्या पंचवीस वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा दस्तावेज 'ज्ञानामृत वाटचाल पंचवीस वर्षांची' या विशेष अंकाचे प्रकाशन करण्यात आले. स्वर्गीय श्रीपतराव चौगुले दादा यांच्या १४ व्या स्मृतिदिनानिमित्त व संस्थेच्या ३० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. तसेच स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी, तर संस्थेचा वार्षिक अहवाल सचिव शिवाजीराव पाटील यांनी सादर केला. प्रास्ताविक व स्वागत प्रा. रवींद्र चौगुले यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. डॉ. बी. एन. रावण यांनी करून दिली, तर आभार प्रा. ए. आर. महाजन यांनी मानले.

11 JAN 2026

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे झालेल्या मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी.

# 'मोडी लिपी प्रशिक्षण' कार्यशाळा

## शिवाजी विद्यापीठात आयोजन : विविध विषयांवर मार्गदर्शन

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियानांतर्गत 'मोडी लिपी प्रशिक्षण' कार्यशाळा झाली. पाच दिवसांत चाळीस विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला.

पहिल्या दिवशी शिराळा येथील विश्वासराव नाईक महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख डॉ. तानाजी हवालदार यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी 'मराठा कालखंड व मोडी कागदपत्रे' या विषयावर माहिती दिली. दुसऱ्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मोडी तज्ज्ञ मच्छिंद्र चौधरी यांनी 'मोडीची ओळख व त्याचे प्रत्यक्ष उपयोजन आणि मोडी कागदपत्राचे प्रकार', तिसऱ्या दिवशी पांडुरंग आंबले यांनी 'मोडी कालगणना व मराठेकालीन कालगणनेचे संशोधकीय उपयोजन' विषयावर मार्गदर्शन केले. चौथ्या दिवशी महावीर महाविद्यालयातील इतिहास विभागातील प्रा. चंद्रशेखर काटे यांनी 'मोडी दस्ताऐवजांची लेखा शैली व गणितीय उजळणी' व शहाजी छत्रपती महाविद्यालयातील प्रा. डॉ. पूनम भुयेकर यांनी 'प्रत्यक्ष मोडीचे उपयोजन तथा उजळणी वर्ग' घेतला. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. निलांबरी जगताप, डॉ. दत्तात्रय मचाले उपस्थित होते

11 JAN 2026
पुढारी

# मोडी लिपी प्रशिक्षणास प्रतिसाद

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ इतिहास अधिविभागातर्फे प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियानाच्या अंतर्गत आयोजित मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

डॉ. तानाजी हवालदार यांनी 'मराठा कालखंड आणि मोडी कागदपत्रे' यांच्या सहसंबंधाविषयी विशेष मार्गदर्शन केले. मोडी तज्ज्ञ मच्छिंद्र चौधरी यांनी मोडीची ओळख व त्याचे प्रत्यक्ष उपयोजन आणि मोडी कागदपत्राचे प्रकारावरील माहिती दिली. मोडी तज्ज्ञ पांडुरंग आंबले यांनी मोडी कालगणना व मराठेकालीन कालगणनेचे संशोधकीय उपयोजन या विषयावर उजळणी वर्ग घेतला. महावीर महाविद्यालय येथील इतिहास विभागाचे सहायक प्रा. मोडी तज्ज्ञ चंद्रशेखर काटे, शहाजी महाविद्यालय येथील सहायक प्रा. पूनम भुयेकर यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेची सांगता शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राच्या समन्वयक डॉ. निलांबरी जगताप यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. दत्तात्रय मचाले व डॉ. पुनम भुयेकर यांच्या विशेष उपस्थितीत झाली. कार्यशाळेसाठी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

11 JAN 2026
सकाळ

# ऑनलाईन पेडगॉजी'वर उद्यापासून कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे 'ई कंटेंट डेव्हलपमेंट आणि ऑनलाईन पेडगॉजी' विषयावर १२ व १३ जानेवारीला कार्यशाळा होत आहे. सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत कार्यशाळा होईल. यात विविध विद्याशाखांतील शिक्षकांसाठी ई कंटेंट निर्मिती, डिजिटल व ऑनलाईन पेडगॉजी, एलएमएस आधारित अध्यापन, आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा शैक्षणिक वापर, कंटेंट डिझाइन व मल्टिमीडिया निर्मिती विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. तरी शिक्षक, अभ्यासक व संशोधकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले आहे.

11 JAN 2026

जनप्रवास

# उद्यापासून ऑनलाईन कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने पीएम-उषा योजनेंतर्गत विविध विद्याशाखांतील अध्यापन व अध्ययन अधिक गुणवत्तापूर्ण, डिजिटलदृष्ट्या सक्षम आणि प्रभावी करण्याच्या उद्देशाने "ई-कन्टेन्ट डेव्हलपमेंट आणि ऑनलाइन पेडॅगॉजी" या विषयावर १२ व १३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत कार्यशाळा होणार आहे.

11 JAN 2026
पुढारी

# एम. फिल., प्री पीएच. डी. कोर्स वर्क परीक्षा १९ पासून

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील एम.फिल., प्री पीएच.डी., कोर्स वर्क अभ्यासक्रमांच्या परीक्षांना दि. १९ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे.

विद्यापीठाच्या वतीने दरवर्षी एम. फिल., प्री पीएच. डी., कोर्स वर्क अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेतल्या जातात. त्याचे वेळापत्रक जाहीर केले जाते. त्यानुसार यावर्षीचे परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाचे सहायक कुलसचिव डॉ. ए. के. गुरव यांनी याबाबतचे परिपत्रक संबंधित अधिविभाग, महाविद्यालयांचे प्राचार्य व शैक्षणिक संस्थांना काढले आहे.

1 1 JAN 2026

लोकमत

# स्वयंसेवी संस्थांनी आपल्या कक्षा विस्तारल्या पाहिजेत : डॉ. ठाकूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी संस्था क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून, त्या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर कार्यरत स्वयंसेवी संस्थांनीही काळानुरूप आपल्या कार्यकक्षा विस्तारल्या पाहिजेत, असे प्रतिपादन पुणे येथील कर्वे समाजसेवा संस्थेचे संचालक प्रा. डॉ. महेश ठाकूर यांनी शनिवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्यातर्फे प्रधानमंत्री उच्च तर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत आयोजित 'बिगर शासकीय संस्थांचे वित्तीय व्यवस्थापन व लेखांकन' या विषयावरील व्यवस्थापन विकास कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी प्रा. डॉ. के. व्ही. मारूलकर यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी आभार मानले. दुसऱ्या सत्रात सनदी लेखापाल अनिल जाधव यांनी 'बिगर शासकीय संस्थांचे लेखांकन' या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या आणि चौथ्या सत्रात पुणे येथील डिग्निटी अकॅडमी या संस्थेचे चंदन देसाई यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अविनाश भाले व प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तेजपाल मोहरेकर, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, भरत रावण उपस्थित होते.

11 JAN 2026
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वयंसेवी संस्थांनी कक्षा विस्ताराव्या : डॉ. ठाकूर

## विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रम

**कोल्हापूर :** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी संस्था क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे. त्या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांनीही काळानुरूप आपल्या कार्यकक्षा विस्तारल्या पाहिजेत, असे प्रतिपादन पुणे येथील कर्वे समाज सेवा संस्थेचे संचालक प्रा. डॉ. महेश ठाकूर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग व सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत आयोजित 'बिगर शासकीय संस्थांचे वित्तीय व्यवस्थापन व लेखांकन' या विषयावरील व्यवस्थापन विकास कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

दुसऱ्या सत्रात सनदी लेखापाल अनिल जाधव यांनी 'बिगर शासकीय संस्थांचे लेखांकन' या विषयावर मार्गदर्शन केले. तिसऱ्या व चौथ्या सत्रात 'अनुदान व्यवस्थापन व दस्तऐवजीकरण' आणि 'वित्तीय उपयोजन व आर्थिक अहवाल' या विषयांवर पुणे येथील डिग्निटी ॲकॅडमीया संस्थेचे चंदन देसाई यांनी मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी प्रास्ताविक केले.

11 JAN 2026

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मस्ट READ

# 'शिवस्पंदन'मध्ये नाट्यशास्त्र विभाग चौथ्यांदा विजेता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या शिवस्पंदन सांस्कृतिक महोत्सवात सलग चौथ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद मिळवित संगीत व नाट्यशास्त्र विभागाने विक्रमी कामगिरी नोंदविली आहे. या विभागाने शोभायात्रेसह सुगम गायन, स्थळचित्रण, एकल नृत्य, भारतीय समूहगीत, मूकनाट्य आणि लघुपट या प्रकारांत प्रथम क्रमांक मिळविला. अखेरच्या दिवशी राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात एकल आणि समूहनृत्य स्पर्धा पार पडल्या. गुरुवारी रात्री प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते शिवस्पंदन महोत्सवाचे पारितोषिक वितरण जल्लोषी वातावरणात करण्यात आले.



शिवाजी विद्यापीठाच्या 'शिवस्पंदन' सांस्कृतिक महोत्सव स्पर्धेत संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या चमूला विजेतेपदाचा चषक प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते देण्यात आला.

**शोभायात्रा :** संगीत व नाट्यशास्त्र, - समूहगीत : संगीत व नाट्यशास्त्र, - लघुनाटिका : गणित, पर्यावरणशास्त्र, - मूकनाट्य : संगीत व नाट्यशास्त्र-लघुपट : संगीत व नाटयशास्त्र, - समूहनृत्य : संगीत व नाट्यशास्त्र.

**एकल लोकवाद्य वादन :** प्रतिक जाधव, रेहान पठाण, गुरुनाथ ढोले, सोहन सुतार, सुप्रिया गुरव.

**सुगम गायन :** प्रथमेश पाटील, सप्निल कोकळे, मृण्मयी पांचाळ, वैभव माळी, विशाल कुंभार.

**नकला :** प्रेम पवेकर, सोहन सुतार, आसावरी लोहार, अंजली मायने, ऋतुजा जांभळे.

**रांगोळी :** मृण्मयी पांचाळ, कुलदीप जठार, सोनल खडकीकर, मोनिका नलवडे, अंकिता घोडके.

**स्थळचित्र :** धोंडी ढवळे, श्रद्धा चराटकर, रमजान मुल्ला, अजित कुलकर्णी, विराज सुर्वे.

**एकल नृत्य :** श्रद्धा शुक्ला, अनुराधा कांबळे, नेहा शिंदे, निधी सावर्डेकर, प्रणय पाटील.

**कथा स्पर्धा (मराठी) :** विमल मोरे, अनिकेत कांबळे, उज्ज्वला कांबळे, निरंजन घुगे, सौरभ कापसे, (हिंदी) : आदित्य सोनावणे, अविनाश कांबळे, प्रतीक्षा पाटील, गुलामगौस तांबोळी, उज्ज्वला कांबळे, (इंग्रजी) : विश्वजीत पाटील, प्रतीक्षा पाटील, प्रेम पवेकर, आदित्य सोनावणे, श्रीधर निंबाळकर.

**कविता स्पर्धा (मराठी) :** अनिकेत कांबळे, यश कवडे, निरंजन घुगे, मोसिम पठाण, प्रिया हळदणकर, (हिंदी) : विनय जंगम, गुलामगौस तांबोळी, अविनाश कांबळे, श्रद्धा लोंढे, उज्ज्वला कांबळे. (इंग्रजी) : अनिकेत कांबळे, नेहा शिंदे, प्रतीक्षा पाटील, श्रीधर निंबाळकर, साक्षी इंजर.

**नाट्य स्पर्धा (मराठी) :** ऋतुजा बडवे, श्रीधर निंबाळकर, साक्षी इंजर, आदित्य सोनावणे, आनंद निळे, (हिंदी) : अविनाश कांबळे, स्वप्नाली धुलुगडे, श्रीधर निंबाळकर, आदित्य सोनावणे, गुलामगौस तांबोळी, (इंग्रजी) : नेहा शिंदे, सत्यम देवकुळे, ओंकार भोसले, प्रेम पवेकर, श्रीधर निंबाळकर.

11 JAN 2026

जनप्रवास




**शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. महेश ठाकूर. सोबत डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. के. व्ही. मारुलकर, अविनाश भाले.**

# स्वयंसेवी संस्थांनी आपल्या कक्षा विस्तारल्या पाहिजेत

## • डॉ. महेश ठाकूर यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी संस्था क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांनीही काळानुरूप आपल्या कार्यकक्षा विस्तारल्या पाहिजेत, असे प्रतिपादन पुणे येथील कर्वे समाज सेवा संस्थेचे संचालक डॉ. महेश ठाकूर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान योजने अंतर्गत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 'बिगर शासकीय संस्थांचे वित्तीय व्यवस्थापन व लेखांकन' या विषयावर हा कार्यक्रम होता. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

डॉ. ठाकूर म्हणाले, बिगर शासकीय संस्थांनी केवळ शासनाकडून किंवा देणगीदारांकडून मिळणाऱ्या आर्थिक सहाय्यावर अवलंबून न राहता, कॉर्पोरेट क्षेत्राकडून सी. एस.आर. (कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व) कायद्यांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी परस्पर सहकार्य वाढवून कॉर्पोरेट कंपन्यांचे व्यवस्थापन, कंपनी सचिव तसेच सनदी लेखापाल यांच्याशी प्रभावी संपर्क व सहसंबंध निर्माण करणे गरजेचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानाने निधी संकलनाला चालना द्यावी.

सनदी लेखापाल अनिल जाधव म्हणाले, स्वयंसेवी संस्थांना विविध स्रोतांमधून प्राप्त होणारे आर्थिक सहाय्य, अनुदाने, देणग्या यांची योग्य नोंद कशी ठेवावी, ताळेबंद व आर्थिक विवरणपत्रे कशी तयार करावीत. पुणे येथील डिग्निटी अकॅडमीया संस्थेचे चंदन देसाई म्हणाले, अनुदान प्राप्त करताना आवश्यक असलेली कागदपत्रे, अहवालांची मांडणी, तसेच निधीचा योग्य व पारदर्शक वापर कसा करावा. यावेळी डॉ. के. व्ही. मारुलकर, अविनाश भाले, डॉ. तेजपाल मोहरेकर, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, भरत रावण, चारुशिला तासगावे, सौरभ पवार, हरीश कांबळे, ज्ञानेश्वरी शिंदे, सामी मुल्ला, तुषार पाटील, विक्रम कांबळे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

11 JAN 2026

जनप्रवास

# नदी हाच माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू

## 'नदीष्ट' या कादंबरीचे लेखक मनोज बोरगावकर यांचे प्रतिपादन

जनप्रवास : कोल्हापूर

नदी हा माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे, असे प्रतिपादन 'नदीष्ट' या कादंबरीचे लेखक मनोज बोरगावकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग आयोजित 'लेखक मुक्तसंवाद' या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

बोरगावकर म्हणाले, निसर्ग वाचणं हीच एक अद्‌भुत गोष्ट असते. तो आनंद अपूर्व असतो. यासाठी मात्र लेखकाने इमान शाबूत ठेवायला हवे. निसर्गाशी नाते जोडायला हवे. यातूनच मी नदीशी जोडला गेलो. नदी हे आईचे रूप आहे. त्यामुळे नदी वाहती राहिली पाहिजे. मी जे केलं ते अंतःकरणातून. गोदामायने व तिथल्या निसर्गाने मला लिहिण्याची प्रेरणा दिली. माझ्या कादंबरीतील घटना या प्रत्यक्ष जीवनाशी निगडित आहेत. सगुणा ही या कादंबरीचा कणा आहे. स्त्री, आई, कविता आणि नदी ही मला एकसारखीच वाटते. यामुळेच नदी माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला. त्यामुळेच जीवनातील एक कवडसा शोधता आला. अध्यक्षस्थानावरून डॉ. शिंदे म्हणाले, 'नदीष्ट'मध्ये मातृत्वाचे एक रूप आणि दुसरे जीवनाचे रूपक आढळते. यातून मानवाचा प्रवास ध्यानात येतो. ही कादंबरी पर्यावरण, सामजिक जाणीव आणि मानवी सहसंबंधांचा शोध घेते. कादंबरी लेखकाची विज्ञानविषयक निरीक्षणे ही वाखाणण्यासारखी आहेत. ही कादंबरी वाचकांचे वाचनभान समृद्ध करणारी आहे.

मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्रांजली क्षीरसागर यांनी केले. आभार डॉ. सुखदेव एकल यांनी मानले. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे, प्राचार्य आर. जी. कुलकर्णी, कृष्णा दिवटे, सुषमा शितोळे, डॉ. कृष्णात पाटील, डॉ. केदार मारुलकर, प्रा. जयसिंग सावंत, अनिल साबळे उपस्थित होते.

11 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# स्वयंसेवी संस्थांनी कक्षा विस्तारल्या पाहिजेत

## डॉ. महेश ठाकूर; शिवाजी विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी संस्था क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून, त्या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांनीही काळानुरूप आपल्या कार्यकक्षा विस्तारल्या पाहिजेत, असे प्रतिपादन पुणे येथील कर्वे समाज सेवा संस्थेचे संचालक डॉ. महेश ठाकूर यांनी केले.

ते शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान योजनेंतर्गत आयोजित 'बिगर शासकीय संस्थांचे वित्तीय व्यवस्थापन व लेखांकन' या विषयावरील व्यवस्थापन विकास कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.



शिवाजी विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रमामध्ये बोलताना डॉ. महेश ठाकूर.

डॉ. ठाकूर म्हणाले, बिगर शासकीय संस्थांनी केवळ शासनाकडून किंवा देणगीदारांकडून मिळणाऱ्या आर्थिक साहाय्यावर अवलंबून न राहता, कॉर्पोरेट क्षेत्राकडून सी.एस.आर. (कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व) कायद्यांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सामाजिक माध्यमांद्वारे संस्थांच्या कार्याचा प्रचार व प्रसार केल्यास संस्थांची विश्वासार्हता वाढून निधी संकलनालाही चालना मिळेल.

दुसऱ्या सत्रात सनदी लेखापाल अनिल जाधव यांनी 'बिगर शासकीय संस्थांचे लेखांकन' या विषयावर मार्गदर्शन केले. स्वयंसेवी संस्थांना विविध स्रोतांमधून प्राप्त होणारे आर्थिक साहाय्य, अनुदाने, देणग्या यांची योग्य नोंद कशी ठेवावी, ताळेबंद व आर्थिक विवरणपत्रे कशी तयार करावीत, कायदेशीर व लेखापरीक्षणाच्या बाबी याविषयी त्यांनी माहिती दिली. अध्यक्षस्थानी डॉ. के. व्ही. मारुलकर होते.

तिसऱ्या व चौथ्या सत्रात अनुक्रमे 'अनुदान व्यवस्थापन व दस्तऐवजीकरण' आणि 'वित्तीय उपयोजन व आर्थिक अहवाल' या विषयांवर पुणे येथील डिग्निटी ॲकॅडमी या संस्थेचे चंदन देसाई यांनी मार्गदर्शन केले. या सत्रांना अविनाश भाले, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. तेजपाल मोहरेकर, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, भरत रावण, चारुशीला तासगावे, सौरभ पवार, हरिश कांबळे, ज्ञानेश्वरी शिंदे, सामी मुल्ला, तुषार पाटील, विक्रम कांबळे आदींनी योगदान दिले.

11 JAN 2026

सकाळ,

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वयंसेवी संस्थांनी कार्यकक्षा विस्ताराव्यात

## प्रा. डॉ. महेश ठाकूर : विद्यापीठात व्यवस्थापन विकास कार्यक्रम

कोल्हापूर, ता. १० : 'स्थानिक पातळीवर कार्यरत स्वयंसेवी संस्थांनी काळानुरूप कार्यकक्षा विस्तारल्या पाहिजेत', अशी अपेक्षा पुणे येथील कर्वे समाजसेवा संस्थेचे संचालक प्रा. डॉ. महेश ठाकूर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान योजनेंतर्गत झालेल्या 'बिगर शासकीय संस्थांचे वित्तीय व्यवस्थापन व लेखांकन' या विषयावरील व्यवस्थापन विकास कार्यक्रमात ते बोलत होते. विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन अध्यक्षस्थानी होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या व्यवस्थापन विकास कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. महेश ठाकूर.

डॉ. ठाकूर म्हणाले, 'राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर स्वयंसेवी संस्थांच्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. प्रकल्प क्षेत्रातील प्रत्यक्ष गरजा, स्थानिक संसाधनांची उपलब्धता व समाजातील बदलते प्रश्न यांचा सखोल अभ्यास करून नावीन्यपूर्ण व परिणामकारक प्रकल्पांची उभारणी करणे आज अत्यावश्यक आहे. बिगर शासकीय संस्थांनी केवळ शासनाकडून किंवा देणगीदारांकडून मिळणाऱ्या आर्थिक साह्यावर अवलंबून न राहता, कॉर्पोरेट क्षेत्राकडून सी. एस. आर. कायद्यांतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. त्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी परस्पर सहकार्य वाढवून कॉर्पोरेट कंपन्यांचे व्यवस्थापन, कंपनी सचिव, सनदी लेखापाल यांच्याशी प्रभावी संपर्क व सहसंबंध निर्माण करणे गरजेचे आहे.' 'आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सामाजिक माध्यमांद्वारे संस्थांच्या कार्याचा प्रचार व प्रसार केल्यास विश्वासार्हता वाढून निधी संकलनाला चालना मिळेल', असेही त्यांनी सांगितले.

सनदी लेखापाल अनिल जाधव यांनी 'बिगर शासकीय संस्थांचे लेखांकन' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी स्वयंसेवी संस्थांना विविध स्रोतांमधून प्राप्त होणारे आर्थिक साह्य, अनुदाने, देणग्या यांची योग्य नोंद कशी ठेवावी, ताळेबंद व आर्थिक विवरणपत्रे कशी तयार करावीत, कायदेशीर व लेखा परीक्षणाच्या बाबी याविषयी सखोल माहिती दिली.

पुणे येथील डिग्निटी ॲकॅडमीचे चंदन देसाई यांनी 'अनुदान व्यवस्थापन व दस्तऐवजीकरण' व 'वित्तीय उपयोजन व आर्थिक अहवाल' या विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांनी अनुदान मिळविताना आवश्यक कागदपत्रे, अहवालांची मांडणी, निधीचा योग्य व पारदर्शक वापर कसा करावा, याची माहिती दिली. डॉ. तेजपाल मोहरेकर, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, भरत रावण, चारुशीला तासगावे, सौरभ पवार, हरिश कांबळे, ज्ञानेश्वरी शिंदे, सामी मुल्ला, तुषार पाटील, विक्रम कांबळे यांनी संयोजन केले. प्रा. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी आभार मानले.